(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२३] ३ एससीआर (S.C.R.) ६३१

दिल्ली डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (दिल्ली विकास प्राधिकरण)

विरुद्ध

बॅटी आणि इतर

(दिवाणी अपील क्रमांक २०२३ चा १९१८)

२२ मार्च, २०२३

[अभय एस. ओक, न्यायमूर्ति आणि राजेश बिंदल, न्यायमूर्ति]

भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना कायद्यातील न्याय्य नुकसानभरपाई आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ - कलम २४(२) - उत्तरवादी मृत व्यक्तीची सून होती - ज्या जमिनीच्या संदर्भात भूसंपादन कार्यवाही झाली होती आणि भूसंपादन जिल्हाधिकारी यांनी निवाडा जाहीर केला होता त्या जमिनीचा मृत व्यक्ती कथित मालक होता - जमिनीचा ताबा घेतला गेला नाही आणि नुकसानभरपाई दिली जात नाही म्हणून संपादन कालबाह्य झाले आहे असा युक्तिवाद करत उत्तरवादीने उच्च न्यायालयात धाव घेतली - उच्च न्यायालयाला असे आढळले की, वास्तविकतः, ताबा राज्य सरकारने घेतला होता परंतु उच्च न्यायालयाने पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य - विरुद्ध - हरकचंद मिसिरीमल सोलंकी आणि इतर *यावर विसंबून असे मत व्यक्त केले की, नुकसानभरपाई दिली गेली नाही, म्हणून वादातीत संपादन कालबाह्य झाले आहे -*

अपीलवर असे म्हटले गेले : पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य *या न्यायनिर्णयामधील निर्णय सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या* घटनापीठाने इंदोर डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (इंदोर *विकास प्राधिकरण) मध्ये फेटाळला - जमिनीचे संपादन पूर्ण झाल्यानंतर जमिनीचा ताबा घेण्यात आला होता असे अभिलेखावर मान्य केलेली तथ्ये स्पष्ट करतात - तथापि, नुकसान भरपाई दिली गेली नाही - जर नुकसानभरपाई मिळविण्यासाठी मालमत्तेतील व्याजाचा दावा करणाऱ्या व्यक्तीच्या मालकीची जमीन* दोन *दशकांहून अधिक काळापूर्वी संपादित केली गेली असेल आणि नुकसानभरपाई दिली गेली नसेल तर असा दावा करणाऱ्या व्यक्तीने कोणती कारवाई केली हे सूचित करण्यासाठी अभिलेखावर कुठलीही नोंद नाही -* इंदोर डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (इंदोर विकास प्राधिकरण) *मध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता केली गेली नाही - त्यामुळे, भूसंपादन कालबाह्य होऊ शकत नाही.*

अपील मंजूर करतांना , न्यायालयाने असा

निर्णय दिला *:* १. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आक्षेपित आदेशाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, *पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन* (*पुणे महानगरपालिका*) *आणि अन्य* यामधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर विसंबून रिट याचिका मंजूर करण्यात आली होती. रिट याचिकाकर्त्याने दाखल केलेले प्रकरण असे होते की, न्यायनिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये दाखविल्याप्रमाणे मयत एच (H) हा जमिनीचा नोंदणीकृत मालक होता. रिट याचिकाकर्ती ही त्याची सून आहे. जेव्हा रिट याचिका दाखल

केली तेव्हा रिट याचिकाकर्तीच्या पतीचाही मृत्यू झाला होता. असा दावा करण्यात आला होता की, मयत एच (H) यांच्याकडे भूमीधारी अधिकार होते, तथापि, अपीलकर्त्याने घेतलेल्या भूमिकेच्या संदर्भात, कोणतेही हयात सदस्यत्व अभिलेखावर दाखल केले गेले नाही. उच्च न्यायालयासमोर उत्तरवादीने घेतलेली निश्चित आणि निर्विवाद भूमिका अशी होती की, निवाडा जाहीर झाल्यानंतर जमिनीचा ताबा घेण्यात आला आणि ती जमीन 'ओ' (O) विभागात येत असल्याने हरितपट्टा शेती आणि जलसाठा म्हणून विकसित करण्यासाठी वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आली होती. [परिच्छेद १३] [६३७-ई-एफ]

२. सुरुवातीला, रिट याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयासमोर अशी भूमिका घेतली होती की, जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आलेला नाही, मात्र तो (ताबा) सोडून देण्यात आला. २०१३ च्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नुकसान भरपाई दिली जावी हा एकमेव युक्तिवाद मांडण्यात आला. *पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य* मधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर विसंबून रिट याचिका मंजूर करण्यात आली. ही वस्तुस्थिती देखील उच्च न्यायालयाच्या लक्षात आली होती की, मालमत्तेच्या मालकीबाबत वाद होता, जो दोन्ही पक्षांनी घेतलेल्या भूमिकेनुसार खुला ठेवण्यात आला होता. याचा अर्थ, नुकसान भरपाई उत्तरवादी /रिट याचिकाकर्त्याच्या पूर्ववर्ती हितसंबंधला देखील दिली जाऊ शकली नसती. ज्या व्यक्तीने नुकसानभरपाई मागण्यासाठी मालमत्तेतील व्याजाचा दावा केला होता, जर त्याच्या मालकीची जमीन दोन दशकांहून अधिक काळापूर्वी संपादित केली गेली असेल आणि नुकसानभरपाई दिली गेली नसेल, तर त्या व्यक्तीने काय

कारवाई केली हे सूचित करण्यासाठी अभिलेखावर कुठलीही नोंद नाही. २०१३ चा अधिनियम लागू झाल्यानंतरच या दाव्याची सुरुवात झाली. *इंदोर डेव्हलोपमेंट ऑथोरिटी* (*इंदोर विकास प्राधिकरण*) - *विरुद्ध* - *मनोहरलाल आणि इतर* या प्रकरणामध्ये या न्यायालयाने २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) च्या घटकांचे लावलेले अर्थ हातात असलेल्या प्रकरणाशी तादात्म्य पावत नाही. भूसंपादन कालबाह्य होऊ शकत नाही. [परिच्छेद १४, १५] [६३७ - जी - एच; ६३८ -ए - सी]

इंदोर डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (इंदोर विकास प्राधिकरण) - विरुद्ध - मनोहरलाल आणि इतर, **(२०२०) ८ एससीसी १२९ : [२०२०] ३ एससीआर १ - अनुसरित**

पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (महानगरपालिका) आणि अन्य - विरुद्ध - हरकचंद मिसरीमल सोलंकी आणि इतर, **(२०१४) ३ एससीसी १८३: [२०१४] १ एससीआर ७८३ - संदर्भित.**

<u>निर्णयजन्य कायदा संदर्भ</u>

[२०१४] १ एससीआर ७८३	**संदर्भित**	**परिच्छेद ०८**
[२०२०] ३ एससीआर १	**अनुसरित**	**परिच्छेद ११**

दिवाणी अपीलीय अधिकारक्षेत्र : २०२३ चे दिवाणी अपील क्रमांक १९१८.

रिट याचिका (WPC) क्रमांक २०१५ चे १२१३५ मधील नवी दिल्ली येथील दिल्ली उच्च न्यायालयाच्या दिनांक ३०.११.२०१७ रोजीचा न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

सोबत

दिवाणी अपील क्रमांक २०२३ चे १९१९.

हजर झालेल्या पक्षांच्या वतीने अधिवक्ता - कु. सुजीता श्रीवास्तव, अश्वनी कुमार, अंशय धतवालिया

राजेश बिंदल, न्यायमूर्ति द्वारे दिला गेलेला न्यायालयाचा न्यायनिर्णय

१. अनुमती मंजूर.

२. हा आदेश दिल्ली उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने रिट याचिका(सी) (W.P.(C)) क्रमांक १२१३५/२०१५ मध्ये दिलेल्या दिनांक ३०.११.२०१७ च्या आदेशातून उद्भवलेल्या दोन अपीलांचा निपटारा करेल. एक याचिका दिल्ली डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (दिल्ली विकास प्राधिकरण) ने दाखल केली आहे तर दुसरी दिल्ली एनसीटी (NCT) सरकारने दाखल केली आहे.

३. उत्तरवादीला नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र, ही याचिका सुनावणीसाठी घेण्यात आली तेव्हा कोणीही हजर झाले नाही.

४. प्रकरणांची तथ्ये अभिलेखावर उपलब्ध आहेत. भूसंपादन अधिनियम, १८९४ (संक्षिप्त, 'अधिनियम') च्या कलम ४ अंतर्गत जारी केलेल्या अधिसूचनाद्वारे दिल्लीच्या काही भागाच्या नियोजित विकासासाठी सुमारे ३,५०० हेक्टर जमिनीचा मोठा भाग संपादित करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर २० जून १९९० रोजी अधिनियमाच्या कलम ६ अंतर्गत अधिसूचना जारी करण्यात आली. भूसंपादन जिल्हाधिकारी (डीएस) (DS), दिल्ली यांनी दिनांक १९.०६.१९९२ रोजी निवाडा क्रमांक

१३/९२-९३ पारित केला.

५. आक्षेपित आदेशात उच्च न्यायालयाच्या लक्षात आलेल्या तथ्यांवरून हे स्पष्ट होते की, उत्तरवादीचा पती मयत मांगे राम हा मयत हरकेश यांचा मुलगा होता. तो उत्तरवादी क्रमांक १ - रिट याचिकाकर्ते यांचा सासरा होता. दिल्लीच्या शाहदरा येथील घारी मांडू गावाच्या महसुली मालमत्तेत असलेल्या खसरा क्रमांक (२८१/४), (१०-११), २८२/४ (१०-३) आणि ८०(२-८) एकूण २३ बिघा आणि *2* बिस्वास क्षेत्रफळ असलेल्या जमिनीमध्ये १/१२ हिस्सा [०१ बिघा आणि १९ बिस्वास आणि ०३ बिस्वानसी] चा नोंदणीकृत मालक असल्याचा दावा करण्यात आला होता.

६. वादातीत संपादनाला उत्तरवादी क्रमांक १ च्या पूर्ववर्ती हितसंबंधानी कधीही आव्हान दिले होते असे सूचित करणारे अभिलेखावर काहीही नाही. भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना कायद्यातील न्याय्य नुकसानभरपाई आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (संक्षिप्त "२०१३ चा अधिनियम") च्या कलम २४(२) चा संदर्भ देत २०१५ साली रिट याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यात असा दावा करण्यात आला होता की, जमिनीचा ताबा घेतला गेलेला नसेल आणि नुकसानभरपाई दिली गेलेली नसेल, त्यामुळे संपादन कालबाह्य झाले आहे.

७. जमिनीचा ताबा राज्य सरकारने घेतला होता आणि ती जमीन 'ओ' (O) विभागात येत असल्याने हरित पट्टा शेती आणि जलसाठा म्हणून विकसित करण्यासाठी ती वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आली होती, ही वस्तुस्थिती उच्च न्यायालयाच्या लक्षात

आली. पुढे असा युक्तिवाद केला गेला की, जमीन प्रत्यक्षात गावसभेत निहित असल्याने कोणतीही नुकसान भरपाई मिळण्याचा उत्तरवादी क्रमांक १ ला हक्क नव्हता.

८. पक्षकारांच्या बाजूने हजर झालेल्या विद्वान अधिवक्त्यांनी मांडलेल्या युक्तिवादांचा विचार केल्यानंतर, उच्च न्यायालयाने, ***पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य - विरुद्ध - हरकचंद मिसिरीमल सोलंकी आणि इतर,*** (२०१४) ३ एससीसी १८३ या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर विसंबून असे म्हटले आहे की, उत्तरवादी क्रमांक १ च्या जमिनीचे वादादीत संपादन कालबाह्य झाले असल्याने, नुकसानभरपाई देण्यात आली नव्हती. जमिनीच्या मालकीबाबत वाद असल्याने उत्तरवादीला नुकसानभरपाईचा हक्क मिळण्याचा मुद्दा खुला ठेवण्यात आला होता.

९. अपीलकर्त्याच्या बाजूने हजर झालेल्या विद्वान अधिवक्त्यांनी मांडलेले युक्तिवाद असे आहेत की, ***इंदोर डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (इंदोर विकास प्राधिकरण) - विरुद्ध - मनोहरलाल आणि इतर,*** (२०२०) ८ एससीसी १२९ मधील या न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या न्यायनिर्णयाच्या दृष्टीने, ज्यामध्ये ***पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य*** या प्रकरणातील (उपरोल्लेखित) या न्यायालयाचा पूर्वीचा न्यायनिर्णय रद्दबातल करण्यात आला होता, तो उच्च न्यायालयाने दिलेला आदेश रद्दबातल करण्यात यावा. जमिनीचा ताबा घेणे किंवा नुकसानभरपाई देणे या दोनपैकी कोणत्याही एका अटींचे पालन करणे हे संपादन टिकवून ठेवण्यासाठी पुरेसे आहे, असे मत घटनापीठाने व्यक्त केले. हातात असलेल्या प्रकरणात, अभिलेखावर मान्य केलेल्या

तथ्यांवरून हे स्पष्ट होते की, संपादन पूर्ण झाल्यानंतर जमिनीचा ताबा घेण्यात आला होता. उत्तरवादी क्रमांक १ चे पूर्ववर्ती हितसंबंध यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्नच नव्हता कारण जमिनीच्या मालकीबाबत वाद होता हे मान्यच आहे. ही जमीन गावसभेच्या नावाने नोंदवण्यात आली आहे. अगदी उच्च न्यायालयानेही आक्षेपित आदेशात मालकीचा प्रश्न खुला ठेवला होता.

१०. अपीलकर्त्याच्या विद्वान अधिवक्त्यांचे म्हणणे ऐकले.

११. या वस्तुस्थितीवर कोणताही वाद नाही की, वादातीत संपादन कालबाह्य झाले आहे असे ठरवण्यासाठी ***पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य*** (उपरोल्लेखित) मधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा उच्च न्यायालयाने आधार घेतला. ***इंदोर डेव्हलोपमेंट ऑथोरिटी (इंदोर विकास प्राधिकरण)*** च्या प्रकरणामध्ये (उपरोल्लेखित) या न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या न्यायनिर्णयाद्वारे ते फेटाळण्यात आले. त्यामधील परिच्छेद ३६२ खाली दिलेला आहे :

> "३६२. परिणामी, पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य (उपरोल्लेखित) मध्ये दिलेला निर्णय याद्वारे फेटाळला जातो आणि पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) (उपरोल्लेखित) ला अनुसरित इतर सर्व न्यायनिर्णय देखील फेटाळले जातात."

१२. घटनापीठाने विचारात घेणे आवश्यक असलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे न्यायनिर्णयाच्या परिच्छेद ३६६ मध्ये देण्यात आली होती. ते खालील प्रमाणे वाचावे :

"३६६. उपरोक्त चर्चा लक्षात घेता, आम्ही खालीलप्रमाणे प्रश्नांची उत्तरे देतो:

३६६.१. कलम २४(१)(ए) च्या तरतुदींनुसार, दिनांक १-१-२०१४ रोजी म्हणजे २०१३ चा अधिनियम लागू झाल्याच्या दिवशी जर निवाडा दिला गेला नाही, तर कार्यवाही कालबाह्य ठरविली जात नाही. २०१३ च्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नुकसानभरपाई निश्चित करावी लागेल.

३६६.२. जर न्यायालयाच्या अंतरिम आदेशाद्वारे समाविष्ट केलेला कालावधी वगळून पाच वर्षांच्या कालमर्यादेत हा निवाडा देण्यात आला असेल, तर २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(१)(बी) अंतर्गत १८९४ अंतर्गत तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही सुरू राहील, जणू ती रद्दबातल करण्यात आलेली नाही.

३६६.३. कलम २४(२) मध्ये ताबा आणि नुकसानभरपाई दरम्यान वापरलेला 'किंवा' हा शब्द 'किंवा नाही ' अथवा 'आणि' म्हणून वाचला पाहिजे. जेथे हा कायदा सुरू होण्यापूर्वी पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे जमिनीचा ताबा घेण्यात आलेला नाही किंवा नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही तेथे २०१३ च्या कायद्याच्या कलम २४(२) अंतर्गत भूसंपादन कार्यवाही कालबाह्य झाल्याचे मानले जाते. दुसऱ्या शब्दांत, जर ताबा घेतला गेला असेल, नुकसान भरपाई दिली गेली नसेल तर त्यात कोणतीही कालबाह्यता नाही. त्याचप्रमाणे, जर नुकसान भरपाई दिली गेली असेल, ताबा घेतला गेला नसेल तर त्यात कोणतीही कालबाह्यता नाही.

३६६.४. २०१३ च्या अधिनियमाच्या च्या कलम २४(२) च्या मुख्य भागात 'भरणे' या शब्दाचा अर्थ न्यायालयात नुकसानभरपाई जमा करणे असा नाही. जमा न करण्याच्या परिणामाची तरतूद कलम २४(२) च्या तरतुदीत करण्यात आली आहे, जर बहुतांश जमिनधारणाच्या संदर्भात ती जमा केली गेली नसेल, तर १८९४ च्या अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत भूसंपादन अधिसूचनेच्या तारखेपर्यंतचे सर्व लाभार्थी (जमीनमालक) २०१३ च्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असतील. भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ३१ अंतर्गत दायित्व पूर्ण न झाल्यास, उक्त अधिनियमाच्या कलम ३४ अंतर्गत व्याज दिले जाऊ शकते. नुकसानभरपाई (न्यायालयात) जमा न केल्याने भूसंपादन कार्यवाही कालबाह्य होत नाही. पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ बहुतांश मालकीच्या बाबतीत ठेवी जमा न झाल्यास, २०१३ च्या अधिनियमांतर्गत 'जमीनमालकांना' १८९४ च्या अधिनियमाच्या कलम ४ अंतर्गत भूसंपादन अधिसूचनेच्या तारखेपर्यंत नुकसानभरपाई द्यावी लागेल.

३६६.५. जर एखाद्या व्यक्तीला १८९४ च्या अधिनियमाच्या कलम ३१(१) अंतर्गत प्रदान केलेल्या तरतुदींप्रमाणे नुकसानभरपाई दिली गेली असेल, तर कलम २४(२) अंतर्गत नुकसानभरपाई न भरल्यामुळे किंवा न्यायालयात नुकसानभरपाई जमा न केल्यामुळे संपादन कालबाह्य झाले आहे असा दावा करणे त्याच्यासाठी खुले नाही. कलम ३१(१) अंतर्गत रक्कम देऊन रक्कम भरण्याचे कर्तव्य पूर्ण होते. ज्या

जमीनमालकांनी नुकसानभरपाई स्वीकारण्यास नकार दिला होता किंवा ज्यांनी जास्त नुकसानभरपाईसाठी संदर्भ मागितला होता, ते २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) अंतर्गत संपादन प्रक्रिया संपल्याचा दावा करू शकत नाहीत.

३६६.६. २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) ची तरतूद कलम २४(२) चा भाग म्हणून मानली जावी, तर कलम २४(१)(बी) चा भाग म्हणून नाही.

३६६.७. १८९४ च्या अधिनियमांतर्गत आणि कलम २४(२) अंतर्गत विचार केल्याप्रमाणे ताबा घेण्याची पद्धत चौकशी अहवाल/निवेदन तयार करणे आहे. एकदा जर १८९४ च्या अधिनियमाच्या कलम १६ अन्वये ताबा घेतल्यावर निवाडा मंजूर झाला तर २०१३ च्या अधिनियमाच्या कलम २४(२) नुसार राज्यातील जमिनीच्या निवाड्यात कोणतेही विनिवेश दिले जात नाही, कारण एकदा ताब्यात घेतल्यावर कलम २४(२) अन्वये कालबाह्य होणार नाही.

३६६.८. १-१-२०१४ रोजी संबंधित प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या भूसंपादनाच्या कार्यवाहीत, २०१३ चा अधिनियम लागू होण्यापूर्वी पाच वर्षे किंवा त्याहून अधिक काळ भूसंपादन आणि नुकसान भरपाई देण्यास अधिकारी अपयशी ठरल्यास, कलम २४(२) च्या तरतुदी लागू होतात. न्यायालयाने पारित केलेल्या अंतरिम आदेशांच्या निर्वाह कालावधीला पाच वर्षांच्या गणनेत वगळले पाहिजे.

३६६.९. २०१३ च्या अधिनियमाचे कलम २४(२) भूसंपादनाच्या पूर्ण झालेल्या कार्यवाहीच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी कारवाईच्या नवीन कारणाला

निर्माण करत नाही. कलम २४ हे २०१३ च्या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या तारखेला म्हणजेच दिनांक ०१-०१-२०१४ ला प्रलंबित असलेल्या कार्यवाहीला लागू होते. हे जुने आणि कालबद्ध दाव्यांचे पुनरुज्जीवन करत नाही आणि संपलेली कार्यवाही पुन्हा सुरु करत नाही किंवा जमीनमालकांना संपादन अवैध ठरवण्यासाठी कारवाई पुन्हा सुरु करण्यासाठी ताब्यात घेण्याच्या पद्धतीच्या कायदेशीर पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याची परवानगी देत नाही किंवा न्यायालयाऐवजी कोषागारात भरपाई जमा करण्याच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकत नाही."

१३. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आक्षेपित आदेशाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, ***पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य*** (उपरोल्लेखित) मधील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर विसंबून रिट याचिका मंजूर करण्यात आली होती. रिट याचिकाकर्त्याने दाखल केलेले प्रकरण असे होते की, न्यायनिर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, मयत हरकेश हा जमिनीचा नोंदणीकृत मालक होता. रिट याचिकाकर्ती त्याची सून आहे. जेव्हा रिट याचिका दाखल केली तेव्हा रिट याचिकाकर्तीच्या पतीचाही मृत्यू झाला होता. असा दावा करण्यात आला होता की, मयत हरकेश यांच्याकडे भूमीधारी अधिकार होते, तथापि, अपीलकर्त्याने घेतलेल्या भूमिकेच्या संदर्भात, कोणतेही हयात सदस्यत्व अभिलेखावर दाखल केले गेले नाही. उच्च न्यायालयासमोर उत्तरवादीने घेतलेली निश्चित आणि निर्विवाद भूमिका अशी होती की, निवाडा जाहीर झाल्यानंतर जमिनीचा ताबा घेण्यात आला आणि ती जमीन 'ओ' विभागात

येत असल्याने हरित पट्टा शेती आणि जलसाठा म्हणून विकसित करण्यासाठी वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आली.

१४. सुरुवातीला, रिट याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयासमोर अशी भूमिका घेतली होती की, जमिनीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आलेला नाही, मात्र तो सोडून देण्यात आला. २०१३ च्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नुकसान भरपाई दिली जावी हा एकमेव युक्तिवाद मांडण्यात आला होता. ***पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (पुणे महानगरपालिका) आणि अन्य*** (उपरोल्लेखित) या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेत रिट याचिका मंजूर करण्यात आली. मालमत्तेच्या मालकीबाबत वाद होता, जो दोन्ही पक्षांनी घेतलेल्या भूमिकेनुसार खुला ठेवण्यात आला होता, ही वस्तुस्थिती देखील उच्च न्यायालयाच्या लक्षात आली होती. याचा अर्थ, नुकसान भरपाई देखील उत्तरवादी/रिट याचिकाकर्त्याच्या पूर्ववर्ती हितसंबंधाला दिली जाऊ शकली नसती. ज्या व्यक्तीने नुकसानभरपाई मागण्यासाठी मालमत्तेतील व्याजाचा दावा केला होता, जर त्याच्या मालकीची जमीन दोन दशकांहून अधिक काळापूर्वी संपादित केली गेली असेल आणि नुकसानभरपाई दिली गेली नसेल तर त्या व्यक्तीने कोणती कारवाई केली हे सूचित करण्यासाठी अभिलेखावर कुठलीही नोंद नाही. २०१३ चा अधिनियम लागू झाल्यानंतरच या दाव्याची सुरुवात झाली.

१५. वर नोंदवलेल्या कारणांमुळे, प्रस्तुतचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे कारण ***इंदोर डेव्हलोपमेंट ऑथॉरिटी (इंदोर विकास प्राधिकरण) - विरुद्ध - मनोहरलाल आणि इतर*** (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये या न्यायालयाने २०१३ च्या अधिनियमाच्या कलम

२४(२) च्या घटकांचे लावलेले अर्थ हातात असलेल्या प्रकरणाशी तादात्म्य पावत नाही. भूसंपादन कालबाह्य होऊ शकत नाही.

१६. त्यानुसार, अपील मंजूर केल्या जातात आणि उच्च न्यायालयाने पारित केलेला आक्षेपित आदेश रद्दबातल केला जातो. उत्तरवादींनी उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका फेटाळली जाते.

अपील मंजूर

अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".